| MHNG180003752019 | – : कि.फौ.अ.क्र. ७३/२०१९ मधील कलम २३ (निशाणी ४) खालील अर्जावरील आदेश : (प्राजक्ता वि लिलाधर ) |
|---|---|

१. सदरचा अर्ज अर्जदार प्राजक्ता लिलाधर बावने यांनी गैरअर्जदार विरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा २००५ (सदर कायदा) चे कलम २३ अन्वये तात्पुरते/ अंतरिम पोटगी व इतर आदेश मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, तिचा व गैरअर्जदारचा विवाह हिंदु जाती रितीरिवाजाप्रमाणे दिनांक १६.०३.२०१७ रोजी मौजे सवंद्री, ता. कळमेश्वर येथे पार पडला होता. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदाराकडे नांदायला मौजा दिग्रस, ता. काटोल येथे गेली. त्यानंतर अर्जदार गैरअर्जदारासोबत पुण्याला राहण्यास गेली. तेथे दोघेही काम करित होते. त्यानंतर अर्जदार गर्भवती झाली. ती पाच महिन्याची गर्भवती असताना ती एच.आय.व्ही. ग्रस्त असल्याचे वैद्यकीय तपासणीमधून निष्पन्न झाले. तेव्हापासून गैरअर्जदाराने तिला त्रास देण्यास सुरवात केली. त्यानंतर गैरअर्जदाराने अर्जदारास माहेरी आणून सोडले. तेथेच तिची प्रसुती झाली. तेव्हापासून अर्जदार तिच्या माहेरी राहत आहे. दरम्यानच्या काळामध्ये गैरअर्जदाराने पती व मुलीचा वडिल म्हणून कोणतीही जबाबदारी पार पाडली नाही. अर्जदार ही काम करण्यासाठी असमर्थ आहे. या उलट, गैरअर्जदार पुण्याला कंपनीमध्ये काम करत असून त्याला महिन्याला रु. १५,०००/- एवढे वेतन मिळते. अशाप्रकारे गैरअर्जदाराने अर्जदारास दुर्लक्षित करुन तिचा कौटुंबिक छळ केला आहे. तिने सदर अर्जामध्ये संरक्षण आदेश, नुकसान भरपाई, तिच्या उदरनिर्वाहासाठी रु.७,०००/- अंतरिम पोटगी व इतर मागण्या मागितलेल्या आहेत.

3. प्रकरणात गैरअर्जदार हजर झाले. त्यांनी त्यांचा लेखी जबाब निशाणी क्र. ०७ वर दाखल केला. त्यात गैरअर्जदाराने अर्जदार सोबत असलेले नातेसंबंध मान्य केले. परंतु, गैरअर्जदाराने अर्जामधील सर्व आरोपी खोटे व बिनबुडाचे असल्याचे म्हणणे मांडले. त्यांनी असे म्हणणे मांडले की, गैरअर्जदार हे एच.आय.व्ही. ग्रस्त आहेत व त्यांना उपचाराकरिता मोठया प्रमाणात खर्च लागतो. त्यामुळे ते पोटगी देण्यास सक्षम नाहीत. वास्तविक पाहता अर्जदार ही सासरी कधीही चांगली राहिली नाही. ती छोट्या छोट्या कारणांवरुन वाद घालीत असे. अर्जदाराने अर्जदाराच्या तब्येतीकडे कधीही लक्ष दिलेले नाही. या उलट, गैरअर्जदाराने पती व वडिल म्हणून जबाबदारी पार पाडलेली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या अर्जामध्ये कोणतेही तथ्य नसल्यामुळे सदर अर्ज नामंजूर करावा अशी विनंती जबाबमध्ये करण्यात आली.

४. दोन्ही बाजुंच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणात हे निर्विवाद तथ्ये आहे की, अर्जदार व गैरअर्जदार यांचे लग्न झाले असुन ते सोबत नांदलेले सुध्दा आहेत. त्यामुळे, प्रथमदर्शनी असे निदर्शनास येते की, अर्जदार व गैरअर्जदार यांच्या मध्ये कौटुंबिक नातेसंबंध होते.

५. प्रकरणातील प्रथमदर्शनी पुराव्याचे अवलोकन करण्याआधी सदर कायद्याच्या कलम २३ मधील कायदीय बाबींचे अवलोकन करणे आवश्यक आहे. सदर कायद्याच्या कलम २३ मध्ये असे नमुद करण्यात आले आहे की, न्यायालयास न्याय व योग्य वाटत असेल व सकृतदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला आहे अथवा नाही किंवा तशी होण्याची शक्यता असेल तर न्यायालय अंतरिम आदेश पारित करु शकतात. या ठिकाणी हे सुध्दा नमुद करणे आवश्यक आहे की, कोणत्याही अंतरिम मागणीचा विचार करताना संपरिक्षेमध्ये अपेक्षित असणा–या भक्कम पुराव्याची आवश्यकता नाही. अंतरिम

मागणीचा अर्ज निकाली काढताना सकृतदर्शनी पुरावा बघणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त अर्ज निकाली काढताना सदर कायद्याच्या हेतु व उद्देशांकडे सुध्दा डोळस दृष्टीने बघणे आवश्यक आहे. सदर कायदा हा महिलां विरुध्द होणा-या हिंसाचारास प्रतिबंध करण्याकरिता तसेच महिलांचे सक्षमीकरण करण्या करिता पारित करण्यात आला आहे. सदर कायद्यामध्ये पुरुषांच्या नैसर्गिक तसेच मुलभुत कर्तव्यांची जाणीव करुन देण्यात आली आहे. प्रत्येक पुरुषाचे हे कर्तव्य आहे की त्याने त्याच्या पत्नीचा व मुलांचा सांभाळ करावा. प्रस्तुतचे कलम २३ अन्वये न्यायालयास अंतरिम पोटगी देण्यासंबधी स्वेछाधिकार प्राप्त आहे. सदर स्वेच्छाधिकार हा निपक्षपातीपणे तसेच वैवाहिक कायद्याच्या तत्वाचे मार्गदर्शन करणारा आणि कायद्याच्या चौकटीमध्ये व कायद्याच्या उद्‌दिष्टांना अनुसरुन करण्यात यावा हे सर्वश्रुत आहे.

६. प्रस्तुत प्रकरणात अर्जदार व गैरअर्जदार यांच्या मधील नातेसंबंधाबाबत कोणताही आक्षेप नाही. त्यामुळे, सदर कायद्यामध्ये नमुद असलेली कौटुंबिक संबंध ही बाब उभयपक्षांमध्ये असल्याचे दिसुन येते. यानंतर, सकृतदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला किंवा नाही ही बाब पडताळुन पाहणे आवश्यक ठरते. अंतरिम पोटगीसाठी सकृतदर्शनी पुराव्याची आवश्यकता आहे. सकृतदर्शनी पुरावा व सबळ पुरावा हे दोन्हीही पुराव्याचे प्रकार एकमेकांपासुन वेगळे आहे. सबळ पुरावा हा उभयपक्षांनी दिलेल्या मौखिक व कागदोपत्री पुरावा व त्यावर घेण्यात आलेला उलट तपास यावरुन ठरविण्यात येतो. या उलट, सकृतदर्शनी पुराव्याचे स्वरुप हे संक्षिप्त आहे. अंतरिम पोटगीच्या अर्जावर निर्णय देतेवेळी उभयपक्षांमार्फत अर्जात नमुद करण्यात आलेली तथ्ये, लेखी जबाबातील तथ्ये आणि पटलावर दाखल केलेले दस्त याचाच विचार करावा लागतो. तसेच, सदर कायद्याच्या कोणत्याही कलमाखाली आदेश करित असताना सदर कायद्याचा

हेतु व उद्दिष्टांकडे सुध्दा लक्ष द्यावे लागते. सदर कायद्याचा उद्देश हा पिडीत व्यक्तिच्या पतीला अथवा त्यांचे नातेवाईकांना शिक्षा देणे हा नक्कीच नाही. या व्यतिरिक्त अंतरिम पोटगी किंवा अर्जावर पिडितेच्या बाजुने आदेश झाला म्हणजे गैरअर्जदारांना प्रकरणात त्यांची बाजु मांडण्याचा अधिकार नाही असाही कायद्याचा स्थापित नियम नाही. अंतरिम आदेशाची तरतुद केवळ काही काळासाठी अर्जदारास चरितार्थ चालविण्यासाठी पैशाच्या स्वरुपातील मदत जलद रितीने व्हावी यासाठी करण्यात आलेली आहे.

७. सदर प्रकरणामध्ये संरक्षण अधिकारी यांनी प्रकरणाबाबत कौटुंबिक घटना अहवाल दाखल केलेला आहे. या ठिकाणी नमुद करणे आवश्यक आहे की, संरक्षण अधिकारी हे सदर कायद्याखाली नियुक्त करण्यात आलेले सक्षम अधिकारी आहेत. सदर कायदयाअंतर्गत दाखल केलेल्या प्रकरणामध्ये कौटुंबिक घटनेच्या बाबतीत चौकशी करण्याचे अधिकार त्यांना देण्यात आलेले आहेत. त्यामुळे, त्यांनी दाखल केलेले कौटुंबिक घटना अहवाल हे प्रथमदर्शनी पुरावा म्हणुन नक्कीच विचारात घेता येईल. कौटुंबिक घटना अहवालामध्ये सरंक्षण अधिकारी यांनी घटनाक्रम म्हणजेच कौटुंबिक छळ नमुद केलेला आहे. तसेच, कलम २३ अंतर्गत ची मागणी मंजुर करावी या नमुना क्रमांक ३ मध्ये नमुद केलेल्या मागणीची सत्यता पटवुन घेतली यास सुध्दा संरक्षण अधिका– यांनी दुजोरा दिलेला आहे. अर्जदाराने स्वतः एच.आय.व्ही ग्रस्त असल्याचे म्हणणे मांडले आहे. या उलट, गैरअर्जदारानेसुध्दा तो एच.आय.व्ही. ग्रस्त असल्याचे म्हणणे मांडले आहे. अर्जदार पाच महिन्याची गरोदर असताना ती एच.आय.व्ही. ग्रस्त असल्याचे वैद्यकीय तपासणीमध्ये निदर्शनास आले होते. याचा पुरावा म्हणून तिने स्वतःचे एच.आय.व्ही. तपासणी अहवालाची छायांकित प्रत पटलावर दाखल केलेली आहे. अर्जदार व गैरअर्जदार हे दोघेही अर्जदाराची तपासणी करण्याअगोदर सोबत राहत होते.

त्यामुळे, गैरअर्जदार सुध्दा एच.आय.व्ही. ग्रस्त आहे यात दुमत नाही. दोन्हीही बाजुंच्या विद्वान वकिलांनीसुध्दा दोघेही एच.आय.व्ही. ग्रस्त असल्याचे सांगितले आहे. अर्जदाराने ती गरोदर असल्यापासून माहेरी राहते व दरम्यानच्या काळामध्ये गैरअर्जदाराने तिला व तिच्या मुलीला कोणतीही आर्थिक मदत केली नाही असे म्हणणे मांडले आहे. या उलट, गैरअर्जदाराने स्वतःच्या वैद्यकीय परिस्थितीबाबत म्हणणे मांडले. परंतु, त्याने अर्जदार व तिच्या मुलीला आर्थिक मदत केली असे दिसून येत नाही. त्यामुळे, सदर बाब मानसिक व आर्थिक छळाच्या व्याख्येमध्ये बसतात. गैरअर्जदार यांनी अर्जदाराविरुध्द नांदण्याचा दावा सुध्दा दाखल केलेला नाही. त्यामुळे, लग्नसंबंध अबाधित ठेवण्याच्या अनुषंगाने त्यांनी केलेले प्रयत्न सुध्दा दिसुन येत नाही. वरील सर्व विवेचनावरुन मी या निर्णयास येतो की, अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळविण्यास पात्र आहे.

८. अंतरिम पोटगी निश्चित करताना गैरअर्जदाराचे उत्पन्न, अर्जदाराच्या जगण्याचे राहनीमान व कौटुंबिक दर्जाही लक्षात घेणे गरजेचे आहे. अर्जदाराने गैरअर्जदार हा पुण्याला नोकरी करतो व त्यापासून त्याला महिन्याला रु.१५,०००/- मिळतात असे म्हणणे मांडले आहे. याउलट, गैरअर्जदाराला नोकरीतून काढून टाकण्याची नोटिस मिळाली होती असे म्हणणे गैरअर्जदाराने मांडले आहे. परंतु, त्याला नोकरीवरुन काढून टाकण्यात आले असे त्याने स्पष्टपणे सांगितलेले नाही. त्यामुळे, गैरअर्जदार हा पुण्याला काम करतो असा प्राथमिक निष्कर्श काढणे चुकीचे होणार नाही. आज रोजी अर्जदार तिच्या वडिलांच्या घरी राहते. ही बाब सुध्दा अंतरिम पोटगीच्या आदेशामध्ये अडसर करणारी असु शकत नाही. अर्जदार सद्य स्थितीला सवंद्री येथे राहत असल्याचे दिसुन येते. सवंद्री सारख्या ठिकाणचे जीवनमान बघता एखाद्या व्यक्तिला दरमहा रुपये २,५००/- पुरेसे वाटतात. वरील चर्चेच्या अनुषंगाने खालील आदेश पारित करण्यात

 

येतो.

## आदेश

| | |
|---|---|
| **१.** | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |
| **२.** | गैरअर्जदार लिलाधर गुलाबराव बावणे यांना असे निर्देशित करण्यात येते की, त्यांनी अर्जदारास अंतरिम पोटगी रक्कम रुपये २५००/- (रुपये दोन हजार पाचशे) प्रतिमहा ही प्रस्तुत अर्जात दाखल दिनांक २५.०३.२०१९ पासुन मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत द्यावी. |
| **३.** | सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षास विनाशुल्क देण्यात यावी. |

कळमेश्वर
दिनांक ०१.०२.२०२१

(हर्षल ना. पोले)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कळमेश्वर, जि. नागपुर

**ENDORSEMENT**

| | | |
|---|---|---|
| Case Argued on | : | 01.02.2021 |
| Judgment dictated on | : | 01.02.2021 |
| Transcription Ready on | : | 01.02.2021 |
| Judgment checked and signed off | : | 01.02.2021 |

**प्रमाणपत्र**

मी खात्रीपूर्वक असे कथीत करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मुळ न्यायनिर्णय प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे

लघुलेखकाचे नाव – आर.एम. परमाल (नि.श्रे.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Harshal Nanasaheb Pole
Date: 2021.02.01 16:15:53 +0530